ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख १० जून, १९५९ | अंक २३

## विविध माहिती

**सीलोनला अमेरिकेची मदत**—सीलोन व अमेरिका ह्यांच्या दरम्यान आर्थिक मदतीचा करार करण्यांत आला आहे. सीलोनमधील विकास योजनांच्या कामासाठी अमेरिका ३·८ कोटी रुपये देणार आहे. त्यांतील कांहीं रक्कम कर्जाऊ आहे व कांहीं मदतीच्या स्वरूपाची आहे. त्याशिवाय सीलोनला २० हजार टन तांदूळ आणि ३० हजार टन आटाहि पुरविण्यांत येणार आहे.

**भारत-संयुक्त अरब प्रजासत्ताक व्यापार**—भारत व संयुक्त अरब प्रजासत्ताक ह्यांच्या दरम्यान दीर्घ मुदतीचा व्यापारी करार करण्यासंबंधी वाटाघाटी चालू आहेत. इजिप्तमधील कापूस भारतीय गिरण्यांना अधिक आकर्षक वाटावा म्हणून कांहीं योजनाहि आंखण्यांत येत आहेत. कापसाच्या खरेदीची चर्चा करण्यासाठी इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. रुइया ह्यांना कैरोला बोलावण्यांत आलें आहे.

**केरळमधील साखरेचा व्यापार**—केरळ राज्य सरकारनें राज्यांतील साखरेचा घाऊक व्यापार परवान्यांच्या पद्धतीनें नियंत्रित करण्याचें ठरविलें आहे. साखरेच्या घाऊक व्यापाऱ्यांना चालू महिनाअखेरपर्यंत कमिशनर ऑफ सिव्हिल सप्लाइजकडून परवाना काढावा लागेल. परवान्याशिवाय व्यापार करतां येणार नाहीं.

**जपानमधील तेलाचा शोध**—जपानमध्यें खनिज तेलाचा शोध करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या कामासाठी स्थापन करण्यांत आलेल्या कंपनीला आपल्या कामांत यश आलें आहे. जपानच्या उत्तरेकडील भागांत एका ठिकाणीं तेल मोठ्या प्रमाणावर आढळलें आहे. ह्या ठिकाणीं भू-गर्भांतून तेल व गॅस उफाळून वर येत आहे.

**ब्रिटनमधील औद्योगिक कलह**—१९५७ सालाच्या मानानें १९५८ सालीं ब्रिटनमधील कारखान्यांतून उद्भवलेल्या औद्योगिक कलहांचें प्रमाण कमी झाल्याचें आढळून आलें. १९५७ सालीं कलहामुळें परिणाम झालेल्या कामगारांची संख्या १३,५०,००० होती ती १९५८ सालीं ५,९१,००० पर्यंत खाली आली. १९५७ सालीं कलहांमुळें कामबंदी झालेल्या वेळा २,८५९ होत्या. १९५८ सालीं अशा वेळा २,६२९ भरल्या.

**हिंदी वसाहतवाल्यांवर परिणाम नाहीं**—गेल्या महिन्याच्या प्रारंभापासून सिंगापूरच्या आणि फेडरेशन ऑफ मलायाच्या सरकारांनीं, परदेशी नागरिकांनीं देशांत स्थायिक होण्याबद्दलचे नवे नियम अमलांत आणले आहेत. परंतु भारतामधील जे नागरिक ह्यापूर्वीच तेथील नागरिक झाले असतील त्यांच्या बाबतींत नव्या नियमांची अंमलबजावणी करण्यांत येणार नाहीं.

**अधिक मदत देण्याची इच्छा**—भारताचे खाणी व जळण मंत्रि श्री. स्वरणसिंग नुकतेंच रशिआचा दौरा करून परत आले. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत रशिआंतील प्रमुख औद्योगिक केंद्रांना भेटी दिल्या. रशिआचे पुढारी भारताबरोबरचे औद्योगिक व व्यापारी संबंध अधिक दृढ करण्यास तयार आहेत, अशी माहिती त्यांनीं भारतांत आल्यावर सांगितली.

**श्रीनगर म्युझिअमची पुनर्घटना**—श्रीनगर येथील म्युझिअमची पुनर्घटना करण्यासाठी काश्मीरच्या सरकारनें ५०,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. पुनर्घटनेचें काम लवकरच हातीं घेण्यांत येईल. ह्याच संग्रहालयामध्यें निसर्ग-इतिहास-विषयक विभाग खोलण्यासाठी मध्यवर्ती सरकारकडून ५०,००० रुपयांची मदत मिळणार आहे. त्यासंबंधीची योजना लवकरच तयार होईल.

**पाकिस्तानांतील पोलादाचा कारखाना**—जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. लेन ऑस्टिन गेल्या एप्रिलमध्यें कराचीला येऊन गेले होते. पाकिस्तानांत पोलादाचा कारखाना काढण्यासंबंधीचा बँकेचा अहवाल आतां त्यांच्याकडून आला असल्याचें समजतें. पाकिस्तानांत मुलतानजवळ हा कारखाना उभारण्यांत येण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचें सरकार सध्या त्याविषयीं विचार करीत आहे.

**कराचीजवळ तेलशुद्धीचा कारखाना**—पाकिस्तान सरकार आणि आंतरराष्ट्रीय तेलकंपन्यांची एक संघटना ह्यांच्यांत कराचीजवळ तेलशुद्धीचा एक कारखाना काढण्याचा करार झाला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १·१५ कोटी पौंड खर्च येणार असून त्यांत दरसाल १५ लाख अशुद्ध तेल शुद्ध करण्यांत येईल. पाकिस्तानांत तेल सांपडत नसल्यामुळें सर्व अशुद्ध तेल परदेशांतून आयात करण्यांत येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### मागासलेल्या देशांना अधिक मदत द्या

अमेरिकेचे अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. डगलस डिलॉन ह्यांनीं कोलंबिआ विद्यापीठांत बोलतांना, औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या राष्ट्रांनीं, विशेषतः अमेरिकेंतल्या भांडवलदारांनीं, मागासलेल्या देशांत अधिक भांडवल गुंतविण्यास पुढें यावें असा सल्ला दिला आहे. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, अविकसित देश हा स्वतंत्र जगाचाच एक भाग आहे. स्वातंत्र्य अगर भाकरी ह्या दोन्हींपैकी एकाचीच निवड करणें आपणांस भाग आहे असें त्या देशांना कधींहि वाटूं देतां कामा नये. स्वातंत्र्यावर होणाऱ्या हल्ल्याला ते तोंड देतात किंवा कम्युनिझमचा मार्ग स्वीकारतात तें स्वतंत्र देशांच्या सरकारांच्या व जनतेच्या धोरणावर अवलंबून आहे. पश्चिमेकडील राष्ट्रांनीं जर त्यांना मदत केली नाहीं तर ते आर्थिक प्रगतीचा कम्युनिस्टांचा मार्ग स्वीकारल्याशिवाय राहणार नाहींत. असें झालें तर त्या देशांतील लोकांच्या हिताच्या दृष्टीनें ती एक शोकपूर्ण घटना होईल, आणि स्वतंत्र जगाचाहि त्यामुळें घात होईल. अमेरिकेंतील खाजगी भांडवल अर्धविकसित देशांत गुंतविण्यांत यावें म्हणून अमेरिकन सरकार उत्तेजन देत आहे. करविषयक कायद्यांत सुधारणा ह्याच हेतूनें करण्यांत येत आहेत. आतांपर्यंत अमेरिकेच्या खाजगी भांडवलाची परदेशांत होणारी गुंतवणूक विषम प्रमाणांत होत आली आहे. बहुतेक सर्व भांडवल कॅनडा, दक्षिण अमेरिका आणि युरोप ह्या ठिकाणीं गुंतविण्यांत आलें आहे. एकंदरींत आशिआंतील देश, आफ्रिका आणि पश्चिम आशिआ ह्या भूभागांकडे खाजगी मालकीच्या अमेरिकन भांडवलाचें फारसें लक्ष गेलेलें नाहीं. ह्या बाबतींत पाश्चात्त्य देश अयशस्वी झाले तर कम्युनिस्ट गटांतील देश त्या देशांना हुकुमशाहीचा आर्थिक प्रगतीचा मार्ग दाखविण्यास तयार आहेत.

### रस्त्यांच्या बांधणीसाठी सर्वांत मोठें कर्ज

जागतिक बँकेनें रस्त्यांच्या बांधणीसाठी दिलेल्या कर्जांपैकी सर्वांत मोठ्या कर्जाची घोषणा केली आहे. कर्जाची रक्कम ७.२ कोटी डॉलर्सची असून ती इराणला देण्यांत आली आहे. पश्चिम इराण व दक्षिण इराण ह्यामध्यें नवे रस्ते बांधण्यासाठी आणि जुने रस्ते दुरुस्त करण्यासाठी अगर त्यांची सुधारणा करण्यासाठी कर्जाचा उपयोग करण्यांत येणार आहे. ह्या सर्व रस्त्यांची मिळून लांबी १,५२० मैल होईल. इराणच्या आखातापासून कॅस्पिअन समुद्राच्या कांठापर्यंत एक महत्त्वाचा रस्ता बांधण्यांत येणार असून त्याला जोडणारे इतरहि रस्ते बांधण्यांत येणार आहेत. इराणचा प्रदेश जर्मनी, फ्रान्स, इटली व स्पेन ह्या सर्व देशांच्या मिळून प्रदेशाइतका मोठा आहे. पण त्या मानानें मुख्य रस्त्यांची व उपरस्त्यांची वाढ मात्र झालेली नाहीं. त्यामुळें शेतीच्या मालाच्या वहातुकीची फार अडचण होते. इराणमधील बराच भाग वालुकामय व रेताड असला तरी उरलेल्या सुपीक भागांची रस्त्यांच्या अभावीं फार कुचंबणा होते. ह्या परिस्थितीमुळें इराणच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत रस्त्यांच्या बांधणीला फार महत्त्व आलेलें आहे. कांहीं अंशानें भारतांतहि अशीच परिस्थिति आहे. रस्ते नसल्यामुळें कित्येक राज्यांतील नैसर्गिक संपत्तीचा विकास झालेला नाहीं. रस्त्यांच्या अपुऱ्या विकासाच्या बाबतींत राजस्थान, मध्यप्रदेश, ओरिसा व आसाम ह्यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. ह्या राज्यांतील रस्त्यांच्या बांधणीसाठी एक स्वतंत्र कॉर्पोरेशन स्थापन करण्याच्या सूचना करण्यांत येत आहेत. कॉर्पोरेशनसाठी लागणारा पैसा राज्य सरकारें, मध्यवर्ती सरकार व जागतिक बँक ह्यांच्याकडून उभारता येण्यासारखा आहे. इराणला ज्याप्रमाणें जागतिक बँकेची मदत मिळाली आहे तशीच भारतालाहि मिळणें अशक्य नाहीं.

**हिमाचल प्रदेशाचें अंदाजपत्रक**—हिमाचल प्रदेशाच्या १९५९-६० च्या अंदाजपत्रकांत ६.९० कोटी रुपयांची तूट दाखविण्यांत आलेली आहे. प्रदेशाचें उत्पन्न २.८६ कोटी रुपये अंदाजण्यांत आलें असून खर्चाचा अंदाज ९.७६ कोटी रुपये करण्यांत आला आहे. प्रदेशांतील आर्थिक विकासाच्या कार्यक्रमासाठी ३.८७ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**खाजगी व सार्वजनिक मालकीचे विभाग**—मध्यवर्ती सरकारचे वहातूक व दळणवळण मंत्रि श्री. स. का. पाटील ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना असें सांगितलें कीं खाजगी व सार्वजनिक मालकीच्या विभागांत विरोध असण्याचें कारण नाहीं. ह्या दोन्ही विभागांनीं देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी सहकार्य करणें अतिशय जरूरीचें आहे.

**आंध्रमधील पूरनियंत्रण-योजना**—आंध्र प्रदेश राज्यांतील पूरनियंत्रणाच्या योजना मध्यवर्ती सरकारनें पुरेसा पैसा मंजूर न केल्यामुळें अडल्या आहेत. राज्य सरकारनें पूरनियंत्रण करण्याच्या ३८ योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केल्या होत्या. त्यासाठी २८.७ कोटी रुपये खर्च येणार होता. पण मध्यवर्ती सरकारनें अवघी दोन कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली.

**गोंड राणीचा पुतळा**—जबलपूर कॉर्पोरेशननें राणी दुर्गावती ह्या गोंड राणीचा पुतळा उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या राणीनें मोंगल सम्राट् अकबर ह्याच्या सैन्याशीं मुकाबला केला होता. १९५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची संवत्सरी साजरी झाली त्यावेळीं टाऊन हॉलमधील व्हिक्टोरिआ राणीचा पुतळा हलविला होता. त्याच जागीं आतां गोंड राणीचा पुतळा उभारण्यांत येईल.

**कोळशाच्या तुटवड्याचा परिणाम**—पोरबंदर येथील कापडाची गिरणी कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें बंद पडण्याची शक्यता आहे, अशी सूचना गिरणीच्या चालकांनीं कामगारांना दिली आहे. पुरवठा असाच कमी राहिल्यास गिरणी बंद पडेल व सुमारें ३,००० कामगारांना बेकारीला तोंड द्यावें लागेल.

**नेपाळमधील नागरी विमान वहातूक**—नेपाळमधील नागरी विमान वहातुकीसंबंधीं अमेरिका व नेपाळ ह्यांच्या दरम्यान करार झाला आहे. कराराप्रमाणें अमेरिका नेपाळला पांच विमानें तावडतोब देणार आहे आणि विमानांसाठी लागणारे सुटे भागहि पुरविणार आहे. त्याशिवाय नेपाळमधील नऊ विमानतळांची सुधारणाहि अमेरिका करणार आहे.


## Deccan Institute of Commerce

**717, BUDHWAR PETH, POONA 2**

Telephone No. 2360.

Opens for the 1959-60 Session on Wednesday, the 24th June, 1959. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., G. D. C. & A., C. A. I. I. B., A. C. W. A., Accountancy, Shorthand, Typewriting and Poona University's External Pre-Degree Commerce Course and External B. Com. Degree Course.

Morning and Evening Classes.

Admissions to respective Courses open to S. S. C., Under-graduates and Graduates.

Prospectus free on application to the Principal.

# अर्थ

बुधवार, ता. १० जून, १९५९





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## सहकारी शेतीसंबंधीं उद्बोधक परिसंवाद

हिंदमधील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी सहकारी शेतीचा अवलंब करण्यांत यावा असा ठराव नागपूर येथें भरलेल्या कॉंग्रेसमध्यें करण्यांत आला. तेव्हापासून हिंदमधील परिस्थिति सहकारी शेतीला अनुकूल आहे किंवा नाहीं ह्यासंबंधी भारतामधील राजकीय पुढारी, अर्थशास्त्रज्ञ व इतर विचारवंत आपआपले विचार व्यक्त करीत आहेत. कलकत्ता येथें भारतीय संस्कृति संसद ह्या संस्थेतर्फे ह्या विषयावर एक परिसंवाद भरविण्यांत आला होता. त्यांत भाषण करतांना लोकसभेचे सदस्य श्री. एम्. आर. मसानी म्हणाले कीं नागपूर ठरावांत निर्दिष्ट करण्यांत आलेली सहकारी शेती अगर सामुदायिक शेती ह्यांच्यामुळें भारतामधील शेतकरी देशोधडीस लागेल, आणि त्यामुळें सर्व देश भुकेकंगाल अवस्थेला पोंचेल. यांत्रिक उपकरणांच्या साह्यानें करण्यांत येणारी शेती लोकशाही नांदत असलेल्या देशांत यशस्वी होणार नाहीं. रशिआ, युगोस्लाव्हिआ आणि पोलंड ह्या देशांच्या उदाहरणांवरून ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे ह्या देशांत सरकारला जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांकडेच अखेरीस तिची मालकी परत द्यावी लागलेली आहे. निदान जमिनीची मालकी स्वतःकडे ठेवण्याची मुभा शेतकऱ्याला द्यावी लागली आहे. ह्या विषयासंबंधीं जी आंकडेवार माहिती भारतांत व इतर देशांत जमविण्यांत आली आहे, तीवरून सहकारी शेतीला प्रतिकूल असेच निष्कर्ष निघतात. कुटुंबाच्या मालकीच्या छोट्या शेतांतून कुटुंबांतील माणसें अतोनात श्रम करतात. अशा लहान शेतांतूनच धान्याचें उत्पन्न चांगलें होतें. सरकारनें पुरस्कार केलेल्या अगर चालविलेल्या सहकारी शेतांमधून इतकें उत्पादन होत नाहीं. देशांत जमीनदारीची पद्धत रद्द करण्यांत आली आहे. पण सहकारी शेती म्हणजे दुसऱ्या प्रकारची जमीनदारीच अंमलांत आणण्यासारखें आहे. उत्तर प्रदेशाचे एक माजी शेतकीमंत्रि श्री. चरणसिंग ह्यांनीं सहकारी शेतीविषयीं लिहिलेल्या ग्रंथांत असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं ह्या शेतींत प्रत्येक शेतकऱ्याला आपले हितसंबंध सरकारनें नियंत्रित केलेल्या एखाद्या भटाला दुय्यम प्रतीचें म्हणून बहाल करावे लागतील. शेतकऱ्याला आपल्या पायावर उभे करण्यासाठी तीन प्रकारानें मदत करतां येण्यासारखी आहे:—(१) पीक हातांत येण्यापूर्वी सहा महिने आधीं अन्नधान्याच्या किमान किंमती जाहीर करण्यांत याव्या. (२) शेतकऱ्याला रासायनिक खतें स्वस्त भावानें पुरविण्याची सोय करण्यांत यावी, आणि (३) स्थानिक परिस्थिति लक्षांत घेऊन शेतीच्या पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यांत यावी.

नागपूर कॉंग्रेसनें जो ठराव केला आहे त्यामुळें रशिअन सरकारचा सहकारी शेतीसंबंधीचा कायदाच देशांत अंमलांत आणण्याचा धोका पत्करलेला आहे. अशा प्रकारचा कायदा केवळ सत्तेच्या जोरावरच अंमलांत आणतां येईल आणि त्याचा परिणाम रक्तपातांत होईल. सहकारी शेतीमुळें हिंदला अखेरीस कम्युनिझमच्या पाशांत पडावें लागले तरी त्याची भीति पं. नेहरूंना वाटत नाहीं. पण लोकांना अशी भीति वाटत आहे. पुढच्या पिढ्यांविषयीं त्यांना ही भीति वाटत आहे. सहकारी शेतीच्या कल्पनेनें देशांतील शेतकऱ्यांत उत्साहाचें वातावरण उत्पन्न झालें आहे असें त्यांचें म्हणणें आहे. पण ही गोष्ट खरी नाहीं. श्री. मसानी ह्यांच्या भाषणानंतर पश्चिम बंगालचे दुय्यम सहकार मंत्रि श्री. सी. आर. रॉय ह्यांचें भाषण झालें. ते म्हणाले कीं सहकारी जीवनाची कल्पना हिंदूंच्या तत्त्वज्ञानाला नवीन अशी नाहीं. सर्व्हिस को-ऑपरेटिव्हच्या द्वारां क्रमाक्रमानें शेतीच्या निरनिराळ्या अवस्थांत सहकारी तत्त्वाचा अवलंब करणें सोपें जाईल.

## हातमाग धंद्याची सहकारी तत्त्वावर उभारणी

मुंबई राज्य हातमाग मंडळाच्या ता. २९ मे रोजीं भरलेल्या बैठकींत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करावयाच्या प्रस्तावासंबंधीं चर्चा करण्यांत आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस मुंबई राज्यांतील हातमागाच्या कापडाचें वार्षिक उत्पादन ३५० दशलक्ष वार होईल असें या बैठकींत सांगण्यांत आलें. हें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या धंद्याची सहकारी तत्त्वावर उभारणी करण्याचा मंडळाचा विचार आहे. सध्यां ४०,००० माग सहकारी चळवळीखाली आलेले असून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राज्यांतील हातमागांच्या ६६ टक्के म्हणजे सुमारें १·२५ लाख हातमाग सहकारी चळवळीखाली आणतां येतील अशी अपेक्षा आहे.

हातमागाच्या कापडाचें उत्पादन आणि विक्री यांची आंकडेवारी गोळा करण्यासाठी राज्यांत २५ केंद्रें स्थापन करण्यांत यावींत असेंहि सदर बैठकींत ठरविण्यांत आलें.

योजनेंत समाविष्ट करावयाच्या पुढील प्रस्तावावरहि बैठकींत चर्चा करण्यांत आली. (१) हातमाग विणकऱ्यांसाठी प्रत्येकी ७५ गाळ्यांच्या अशा २५ ते ३० वसाहती बांधणें, (२) राज्यांत १५,००० विजेवर चालणारे माग चालू करणें, (३) विणकरांच्या सहकारी संस्थांना ग्रॅन्ट-तथा-कर्ज पद्धतीवर सुधारलेली साधनसामुग्री उपलब्ध करून देणें.

तसेंच १९५९–६० सालीं हातीं घ्यावयाच्या योजनांसंबंधींहि मंडळानें चर्चा केली. या योजना यापूर्वीच सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आल्या आहेत. त्याप्रमाणें चालू वर्षी कांहीं नवीन योजनांवर आणखी कांहीं जुन्या योजना या वर्षी चालू ठेवण्यासाठी सुमारें ४२ लाख रु. खर्च करण्यांत येतील. यापैकी ८ लाख रु. कर्ज व ३४ लाख रु. ग्रॅन्ट म्हणून समजण्यांत येतील. या योजनांपैकी पुढील कांहीं योजना महत्त्वाच्या आहेत. नागपूर, कामठी आणि चांदा येथें विणकर कामगारांच्या सहकारी संस्थांसाठी इमारती बांधण्यासंबंधीची, ५·५ लाख रु. खर्चाची योजना आणि हातमाग कापडावर रिबेट देण्यासंबंधीची योजना. या प्रीत्यर्थ २७ लाख रु. खर्च करण्यांत येतील.

## साखरेच्या उत्पादनांत सहकारी कारखान्यांचें स्थान

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस देशांतील एकूण साखरेच्या उत्पादनापैकी २१ टक्के उत्पादन सहकारी साखर-कारखान्यांतर्फे होऊं लागेल. १९५७-५८ सालच्या गळिताच्या हंगामांत १४ सहकारी साखर कारखान्यांनीं १.५ लाख टन अथवा त्या सालांतील एकूण उत्पादनाच्या ७.५ टक्के साखर निर्माण केली. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभापासून २८ सहकारी कारखान्यांना परवाने देण्यांत आले आहेत. त्यांपैकी २१ कारखान्यांनीं प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ केला. सात कारखान्यांनीं चालू वर्षीच उत्पादनास प्रारंभ केला. आणखी सहा साखर कारखान्यांच्या उभारणीचें काम चालू आहे. ह्या कारखान्यांना लागणारी बहुतेक यंत्रसामुग्री परदेशांतून आयात करण्यांत आली व त्यासाठी बरेंच परदेशीय चलन खर्च करावें लागलें. बाकीच्या सहकारी साखर कारखान्यांसाठी लागणारी यंत्रसामुग्री देशांतच तयार करण्यांत येत आहे. त्यासाठी साखरेची यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या कारखान्यांची संघटना स्थापन करण्यांत आली आहे. जे यांत्रिक भाग देशांत तयार करतां येणें शक्य नाहीं तेवढेच भाग वरील संघटना परदेशांतून आणण्याची व्यवस्था करणार आहे. सध्यांच्या अंदाजाप्रमाणें ४ साखर कारखान्यांची यंत्रसामुग्री १९६० अखेर तयार होईल. आणखी ७ कारखान्यांची यंत्रसामुग्री १९६१ अखेर तयार होईल. ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीं स्वतःच पुढाकार घेऊन सहकारी तत्त्वावर साखर-कारखाने उभारले आहेत. साखरेच्या धंद्यांत अशा तऱ्हेनें सहकारी तत्त्वाचा नव्यानें व मोठ्या प्रमाणावर प्रवेश झालेला आहे. सहकारी चळवळीच्या इतिहासांतहि ही वैशिष्ट्यपूर्ण घटना म्हणतां येईल. सहकारी साखर कारखान्यांचें भांडवल उभारण्याच्या कामीं राज्य व मध्यवर्ती सरकार ह्यांची चांगली मदत होते.

---

## डेक्कन बँक्स असोसिएशनचे नवे पदाधिकारी

दि डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणें या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन १९५९ सालाकरितां खालीलप्रमाणें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें :—

१ अध्यक्ष :—श्री. के. पां. जोशी,
चेअरमन, भारत इं. बँक, लि. पुणें.

२ उपाध्यक्ष :—श्री. जी. जी. साठे, बँक ऑफ पूना लि. पुणें.

३ ऑनररी सेक्रेटरी व ट्रेझरर :—श्री. म. व्यं. शिंगरे,
चेअरमन, भोर स्टेट बँक लि. पुणें.

४ ऑनररी असि. सेक्रेटरी :—श्री. आर. बी. साळवेकर,
डायरेक्टर भारत इं. बँक लि. पुणें.

इतर सभासद बँका :—दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि. पुणें.
दि प्रेसिडेन्सी इं. बँक लि., पुणें.
दि बँक ऑफ कराड, लि., कराड.

---

## इंग्लंडच्या राणीसाठी हापूस आंबे

भारतांतून परदेशांकडे व्यापारी दृष्टीनें आंब्यांची निर्गत होण्यास प्रोत्साहन मिळावें ह्यासाठी प्रयत्नांचा एक भाग म्हणून एअर-इंडिया इंटरनॅशनलनें इंग्लंडची राणी एलिझाबेथ आणि प. जर्मनीचे चॅन्सलर डॉ. कोनरॅड ॲडिनॉर ह्यांना निवडक हपूसचे आंबे भेटीदाखल दिले.

## आंध्र विद्यापीठांत सहकारासाठी प्राध्यापक

सहकारी चळवळीच्या तत्त्वांच्या पुरस्कारास उत्तेजन देण्यासाठी आंध्र विद्यापीठानें सहकारासाठी एका प्राध्यापकाची योजना केली आहे. आंध्र प्रदेशांतील बँकांनीं त्यांच्या वार्षिक खर्चाच्या तरतुदीसाठी फंड निर्माण केला आहे. लायक प्राध्यापकासाठी शोध चालू आहे.

---

## ईस्टर्न मर्कंटाइल बँकेची स्थापना

पाकिस्तान सरकारनें पूर्व पाकिस्तानांत २५ लक्ष रुपये भांडवलाच्या एका बँकेच्या स्थापनेस मान्यता दिली आहे. तिचें नांव ईस्टर्न मर्कंटाइल बँक असें राहील आणि तिच्या बऱ्याच ठिकाणीं शाखा उघडण्यांत येतील.

---

**रेल्वेच्या सामुग्रीचा कारखाना**—बनारस येथें रेल्वेला लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. रेल्वेच्या एंजिनांना लागणारे सुटे भाग कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहेत. कारखान्यासाठी लागणारी जागा मिळविण्यांत आली आहे. उभारणीस सुमारें ४ कोटी रुपये लागतील. रेल्वे एंजिनांच्या दुरुस्तीचें काम कारखान्यामुळें सोपें जाईल.

**रांची जिल्ह्यांतील धरण**—रांची जिल्ह्यांतील हाटिआ धरणाच्या पहिल्या टप्प्याच्या कामाला बिहार सरकारनें मान्यता दिली आहे. ह्या कामासाठी १.२६ कोटी रुपये खर्च येणार आहे. हाटिआ ह्या ठिकाणीं ओतकामाची भट्टी व भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यांसाठी लागणाऱ्या पाण्यासाठी धरण बांधण्यांत येत आहे.

**जगांतील सर्वांत मोठी झोतभट्टी**—लोखंड बनविण्याची जगांतील सर्वांत मोठी झोतभट्टी रशिआंत बांधण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें जगांतील सर्वांत मोठें जलविद्युत् केंद्रहि रशिआंत बांधण्यांत येत आहे. रशिआची झोतभट्टी अमेरिकेमधील डेट्रॉइटमधील लोखंडाच्या कारखान्यांपेक्षाहि मोठी होईल. तींत रोज ४५ ते ५५ हजार टन बिडाचें लोखंड तयार होईल.

**कॅन्सरच्या रोगावरील संशोधन**—लंडनमधील एका संशोधिकेनें कॅन्सरवरील उपाययोजनेच्या बाबतींत कांहीं महत्त्वाचा शोध लावल्याची वार्ता आहे. उंदरावर संशोधन करून हा शोध लावण्यांत आला आहे. संशोधनामुळें मनुष्याच्या रक्ताच्या रासायनिक प्रक्रियेवर अधिक प्रकाश पडला आहे. कॅन्सरवरील उपाययोजनेच्या मोहिमेंत हा शोध परिणामकारी ठरण्याचा संभव आहे.

**पाकिस्तानची नवी राजधानी**—पाकिस्तानचें सरकार कराची ऐवजीं रावळपिंडी येथें राजधानी थाटण्याचा विचार करीत आहे. कराचीपेक्षा रावळपिंडी हें शहर हवेच्या दृष्टीनें व लष्करी महत्त्वाच्या दृष्टीनें अधिक सोयीचें आहे असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. राजधानीसंबंधीं अद्याप अखेरचा निकाल लागलेला नाहीं. पण पाकिस्तानांतील बऱ्याच परदेशीय प्रतिनिधींनीं रावळपिंडीला जमिनी घेऊन आपल्या इमारतीहि बांधल्या आहेत.

**हिंदी शब्दकोशासाठीं मदत**—मध्यवर्ती सरकारनें वाराणशीच्या नागरी प्रचारिणी सभेला १५,००० रु. मदतीदाखल दिले आहेत. ह्या रकमेचा उपयोग करून सभेतर्फे सर्वमान्य झालेल्या एका हिंदी शब्दकोशाची नवीन आवृत्ति काढण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें कांहीं अभिजात हिंदी वाङ्मयहि प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

## काय करा, काय करूं नका, शिकविणारी संस्था

### परदेशी मित्र जोडण्याचें तंत्र: योजनाबद्ध शिक्षण

माझ्या एका मित्रानें आपल्या घरीं एका पाश्चात्य मैत्रिणीला चहाचें निमंत्रण दिलें होतें व त्या निमित्तानें कांहीं स्थानिक मित्र-मैत्रिणींनाहि त्यानें निमंत्रित केलें होतें. ह्या गोड प्रसंगीं त्या पाश्चात्य विदुषीनें आपल्या संभाषणाच्या ओघांत हिंदी स्त्रियांच्या साडीची खूपच प्रशंसा केली. "साडीइतका सोईस्कर, व्यंगें लपविणारा पण हवे ते भाग उठवून दाखविणारा सुंदर पोषाक जगांत कोठेंहि आढळत नाहीं" असें ती म्हणाली. प्रसंगानिमित्तानें जमलेल्या स्त्रियांच्या तोंडावर कोण आनंद दिसूं लागला तिच्या या प्रशंसेनें; पण त्यांतल्या एका चुणचुणीत मुलीनें तिला उलट प्रश्न केलाच, "तुम्ही सर्व चांगल्या गोष्टींचें अनुकरण करतां, त्या आत्मसातहि करतां; मग आमची साडी तुमच्या देशांत अजून कां लोकप्रिय होत नाहीं? उलट तुम्ही तर आमच्या देशांतहि साडी नेसत नाहीं! असें कां?" ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याचें त्या विदुषीनें सोईस्करपणें टाळलें हें निराळें सांगावयाला नकोच. तिला भारतांत येण्यापूर्वीच येथील स्त्रियांच्या साड्यांचें कौतुक करण्यास पढवून ठेवलेलें होतें हें बाकीच्यांना कसें ठाऊक असणार?

दरसाल हजारों अमेरिकन लोक, त्या देशाचे प्रतिनिधी म्हणून, इतर देशांत जात असतात. त्यांपैकी कित्येक अमेरिकन परराष्ट्रीय खात्यांतील अधिकारी असतात. अलीकडे मात्र त्यांच्या ह्या भूमिकेपेक्षा ते अमेरिकन जनतेचें प्रतिनिधी आहेत ह्या भूमिकेला अधिक महत्त्व दिलें जातें. त्यांनीं वेगवेगळ्या देशांतील जनतेशीं सलगी वाढवावी आणि अमेरिकेला नवे मित्र जोडावे अशी त्यांच्याकडून अपेक्षा असते. ह्या प्रतिनिधींप्रमाणें अर्थातच त्यांच्या पत्नींहि त्या सर्व बाबतींत प्रवीण व्हायला पाहिजेत. हें साध्य होण्यासाठी अमेरिकन सरकार आर्लिंग्टन येथें फॉरिन सर्व्हिस इन्स्टिटयूट चालवीत असून ह्या इन्स्टिटयूटवर दरसाल २,५०,००,००० रुपये खर्च करते. भारतांत येणाऱ्या अमेरिकन प्रतिनिधींचा व त्यांच्या पत्नींचा गोडबोलेपणा आणि भारताची प्रशंसा ह्यांच्या मागें शिक्षणाची पद्धतशीर संघटना कशी उभी आहे; विशेषतः अमेरिकन अधिकाऱ्यांच्या पत्नींना त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका कशी समजावून सांगण्यांत येते ह्याची प्रस्तुत संस्थेच्या पुढील उपक्रमावरून थोडक्यांत कल्पना येऊं शकेल.

### कौटुंबिक हिताबरोबरच राष्ट्रहितहि

'आपल्यापैकी किती जणांना भारताबाहेर जाऊन भारताचे प्रतिनिधी म्हणून वावरण्याला संधि मिळणार? मग याची उठाठेव कशाला?' असें सर्वसामान्य भारतीयांना वाटणें स्वाभाविक आहे; पण त्याला उत्तर असें कीं, ही बाब व्यापक महत्त्वाची आहे. आपण भारतांतील वेगवेगळ्या राज्यांत जातो तेव्हां नाहीं का आपल्याला महाराष्ट्राचें प्रतिनिधित्व करायला मिळत? शिवाय दुसरें असें कीं स्त्रियांचा विवाह जसा त्यांच्या पतीबरोबर झालेला असतो तसाच तो अप्रत्यक्ष रीत्या त्यांच्या व्यवसायाबरोबरहि झालेला असतो हें कित्येक स्त्रियांच्या लक्षांतच येत नाहीं. सध्याच्या व्यापक जगांत यशस्वी गृहिणीची भूमिका चांगली वठत नाहीं. बदलत्या कालमानानुसार त्यांच्याकडून पतींच्या कितीतरी जास्त अपेक्षा असतात. त्यांच्या व्यवसायाच्या उत्कर्षाला पत्नीचे व्यवहार-वागणें-बोलणें सर्वच पोषक व्हावयाला पाहिजे असें त्यांना वाटत असतें. महत्त्वाकांक्षी पुरुषांना विचारा म्हणजे तें अगदी निर्विवादपणें हेंच सांगतील. आमच्या स्त्रीवर्गाला हें पटलें तर त्यांत कौटुंबिक हिताबरोबरच त्या राष्ट्रहितहि साधूं शकतील.

### फॉरिन सर्व्हिस इन्स्टिटयूट

अमेरिकेचे प्रतिनिधी म्हणून वेगवेगळ्या देशांत जाणाऱ्यांना अवश्यक ते सर्व शिष्टाचार, बोलण्या-वागण्याच्या तऱ्हा ह्या इन्स्टिटयूटमध्यें तज्ज्ञ व अनुभवी शिक्षक-शिक्षिकांद्वारें शिकविल्या जातात. दरवर्षी सुमारें ३,००० लोकांना ह्या संस्थेंत प्रवेश मिळतो; त्यांपैकी २,००० लोक विशिष्ट अभ्यासक्रमापुरतेच त्यांत दाखल झालेले असतात. परराष्ट्रीय खात्यांतील अधिकाऱ्यांच्या पत्नींना तर या संस्थेंत त्यांच्या पतींच्या नोकरीच्या देशांतील संस्कृति व चालीरीती ह्यांचें तपशीलवार शिक्षण दिलें जातें; वकिलातींतील शिष्टाचार त्यांना समजावून सांगण्यांत येतात. जगांतील कानेकोपरे पाहून आलेल्या सुविद्य व अनुभवी महिलांकडे हें शिक्षण देण्याचें काम सोंपविलेलें असतें.

सरकारी नोकरी करणाऱ्या पतींपेक्षाहि त्याची पत्नी म्हणून वागण्या-बोलण्यांतील धोरण सांभाळण्याचें काम अधिक अवघड असण्याचा संभव आहे हें पत्नींच्या मनावर बिंबविण्यांत येतें. पुरुषांचा बहुतेक सर्व वेळ त्यांच्या कचेऱ्यांतील अमेरिकन वातावरणांतच खर्च होतो पण त्यांच्या पत्नींना मात्र परठिकाणीं अपरिचित वातावरणांत एकट्यांना मार्ग काढावा लागतो. घराची व्यवस्था पाहणें, मुलांची जोपासना करणें, स्थानिक नोकरांकडून सफाईदार कामें करून घेणें, गर्दीच्या बाजारांतून कधीं न पाहिलेलीं खाद्य-पेयें आणणें, घरगुती यांत्रिक उपकरणांची दुरुस्ती करणें, हीं तर झालीं नित्याचीं कामें; त्यांत कितीतरी नैमित्तिक कामांची सारखी भर पडतच असते.

### शंकानिवारण

अमेरिकन परराष्ट्रीय खात्यांतील अधिकाऱ्यांची नेमणूक होऊं शकेल अशीं सबंध जगांत २७८ ठिकाणें आहेत. प्रत्येक ठिकाणचीं वैशिष्ट्यें अर्थातच वेगवेगळीं असणार हें उघड आहे. सर्व ठिकाणांना लागूं पडतील अशा कांहीं मूलभूत माहितीवजा सूचना व त्यांच्या जोडीला प्रत्येक ठिकाणीं लागू पडणाऱ्या तपशिलाची खास व्यवस्था करण्यांत आलेली आहे. खाण्यापिण्याच्या अडचणी, सामाजिक रीतीभाती, इत्यादींच्या प्रत्येक ठिकाणच्या स्वतंत्र फायली करून ठेवलेल्या आहेत. त्यामुळें, पतीच्या नेमणुकीच्या जागीं जातांना पत्नीला तेथील वागणुकीची पुरेपूर माहिती मिळूं शकते. त्या ठिकाणीं राहून आलेल्यांशीं चर्चा करण्याची संधीहि दिली जाते. अफगाणिस्तानांत जाणाऱ्या तरुणीला समजावून सांगण्यांत येईल कीं तेथें अफगाण दंपतीशीं पाश्चात्य पद्धतीप्रमाणें खेळीमेळीचें नातें ठेवतां येणार नाहीं. तेथील स्त्रिया पडदा पाळतात. परीटघडीचा कपडा जकार्तामध्यें किती दिवस पांढराशुभ्र राहतो?–वॉशिंग्टनमध्यें जितके दिवस तितकेच दिवस जकार्तामध्यें; तेहेरानमध्यें पाणी पिण्याला हरकत नाहीं ना? वकिलातीच्या खास पाणी-पुरवठ्याचेंच पाणी प्यावें; इतर पाणी पिऊं नये; मी गरोदर असलें तरी सुद्धां सरकारी समारंभांना मला जावें लागेल काय?–नोकरीच्या ठिकाणावर तें अवलंबून राहील. दक्षिण अमेरिका खंडांत गर्भवती स्त्रियांना विशेष मान आहे; बहुतेक ठिकाणीं तुझें स्वागतच होईल पण आफ्रिकेंतील टोळीवाल्यांना मात्र तुझी उपस्थिति खपणार नाहीं. अशा तऱ्हेनें अनेक लहानमोठ्या शंकांचें निवारण केलें जातें.

## इन्स्टिटयूटचें व्यापक स्वरूप

इन्स्टिटयूटमध्यें पत्नींना दिलें जाणारें शिक्षण, शिष्टाचार आणि घरगुती सूचना एवढ्यापुरतेंच मर्यादित नाहीं. अमेरिकेच्या परराष्ट्रांतील वकिलाती आणि वेगवेगळीं मंडळें ह्यांच्या माहितीचाहि अभ्यासक्रम ओसलेला आहे. अमेरिकेचें राजकारण, रोजगार, कला, शेती, संगीत, वास्तुशास्त्र इत्यादींच्या माहितीचा त्यांत समावेश असतो. त्याचा उद्देश असा कीं परदेशांत जाणारांना स्वदेशाबद्दल धोरणानें आणि जाणतेपणानें बोलतां यावें; अमेरिकेच्या त्या लव्यासुव्या प्रतिनिधि व्हाव्यात, अमेरिकन राहणी आणि आचारविचार ह्यांविषयींच्या श्रेष्ठत्त्वाची कल्पना सोडून देऊन अन्यदेशियांच्या राहणीबद्दल आणि आचारविचारांबद्दल आदर दाखविला जावा असाहि त्यांत हेतु आहे. अशा ह्या इन्स्टिटयूटला "काय करा आणि करूं नका शिकवणारी शाळा" असें म्हणायला हरकत नाहीं.

इन्स्टिटयूटमध्यें परदेशांतील भाषांच्या अध्ययनास अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे; त्याच्या खालोखाल महत्त्व परदेशीय लोकांशीं समरस होऊन काम कसें करावें ह्याच्या शिक्षणास आहे. लंडन, पॅरिससारख्या आकर्षक ठिकाणीं नेमणूक होण्याची मनीषा न बाळगतां जगांत कोठेंहि जाण्याची तयारी ठेवायला इन्स्टिटयूटमधील विद्यार्थ्यांना सांगण्यांत येतें. इन्स्टिटयूटच्या बजेटपैकीं ६० टक्के रक्कम परदेशी भाषांच्या शिक्षणावर खर्च केली जाते. गेल्या वर्षी इन्स्टिटयूटमध्यें २७ भाषांचे वर्ग चालू होते व त्यासाठीं वेगवेगळया भाषांचे १०० स्थानिक शिक्षक अमेरिकन भाषा-पंडितांना मदत करीत होते. परराष्ट्रीय खात्यांतील अधिकारी, नोकर आणि त्यांच्या पत्नी ह्या सर्वांनीं किमान एक तरी परदेशी भाषा आत्मसात् करावी अशी अपेक्षा असते. रशियन, पोलिश, झेक, टर्किश, अरेबिक, हिंदी, मंडारिना, चायनीज, जपानीज, बर्मीज, कोरिअन इत्यादि भाषांचें महत्त्व वाढत चाललें आहे. स्थानिक भाषेंत बोलतां येणें, त्या भाषेंतील पुस्तकें व वृत्तपत्रें वाचणें ह्या गोष्टी अत्यंत आवश्यक झाल्या आहेत. माझ्या भाषेंतच मी बोलेन ही वृत्ति आंतरराष्ट्रीय बैठकींत प्रतिष्ठेची बाब म्हणून खपली तरी जेथें माणसें जोडावयाचीं आहेत तेथें त्यांच्या भाषेंतच बोललें पाहिजे, त्यांच्या भाषेंतच विचार सुचले पाहिजेत.: मनुष्यसंपर्काच्या बाबतींत अधिकाऱ्याच्या पत्नीची भूमिका अत्यंत जिव्हाळ्याची ठरते. आपल्या पतीच्या कार्याला आवश्यक असे गुण स्वतःमध्यें निर्माण करणें व वाढविणें आवश्यक आहे असें पत्नीला वाटूं लागणें ही प्रगतीची पहिली पायरी होय. पतीच्या लायकीवर पत्नीच्या असहकारी धोरणामुळें पाणी पडतें असें कित्येक ठिकाणीं दिसून येतें. पतीच्या व्यवसायाशीं समरस होणाऱ्या गृहिणींची आतां अधिकाधिक आवश्यकता आहे. तळमळ असेल तरच प्रयत्नांची जोड देणें शक्य आहे.

(श्री. बा. काळे, ह्यांचा "उद्यम" च्या मे, १९५९ च्या अंकांतील लेख)

---

## दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि.

१९५८ मध्यें वरील कंपनीनें १०·५ लक्ष रुपयांच्या मालाची विक्री केली आणि सर्व खर्च भागवून ५७,७०० रु. नफा मिळविला. शिलकी तोटा वजा जातां, नफावांटणीस ५०,२६८ रु. राहतात. ४% डिव्हिडंडला ४०,००० रु. लागतील. ओगले ब्रदर्स (प्रा.) लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. कंपनीचें वसूल भांडवल १० लक्ष रु. असून इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचें ३,२९,००० रु. कर्ज आहे.

## मुंबई राज्यांतील दुकानें व व्यापारी संस्था

### नोकरांचे वेतनाचे किमान दर

राज्यांतील दुकानें आणि व्यापारी संस्थांमधील नोकरीचे बाबतींत मुंबई सरकारनें वेतनाचें किमान दर निश्चित केले आहेत.

किमान वेतनाचे दर निश्चित करण्यासाठीं दुकानें आणि व्यापारी संस्था पुढीलप्रमाणें तीन वर्गांत विभागण्यांत आल्या आहेत:—(१) "मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस" चा (१९४८ च्या फॅक्टरी ॲक्टांत उल्लेख करण्यांत आल्याप्रमाणें) अवलंब करणारीं दुकानें आणि व्यापारी संस्था आणि केशकर्तनालयें, धोब्याचीं आणि शिवणकामाचीं दुकानें आणि यासारख्या धंद्यांत १० पेक्षा कमी नोकर असलेलीं दुकानें आणि व्यापारी संस्था. (२) दोन पेक्षा अधिक नोकर असलेलीं दुकानें आणि उपर्युक्त (१) मध्यें नमूद केलेल्या व्यापारी संस्था सोडून इतर सर्व व्यापारी संस्था, आणि (३) उपर्युक्त (१) मध्यें नमूद केलेलीं दुकानें सोडून दोन किंवा कमी नोकर असलेलीं दुकानें, त्याचप्रमाणें पुढीलप्रमाणें कामगारांचे तीन वर्ग पाडण्यांत आले आहेत:—कुशल, निम-कुशल आणि अकुशल.

आवश्यक ते नोटिफिकेशन मुंबई सरकारच्या दि. १८ एप्रिलच्या जादा गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

मुंबई राज्य ६ भागांमध्यें विभागण्यांत आलें असून प्रत्येक भागासाठीं निरनिराळे दर निश्चित केले आहेत.

(ए) बृहन्मुंबईच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या हद्दींतील विभाग झोन १ मध्यें मोडतो, (बी) अहमदाबादच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या हद्दींतील विभाग झोन २ खालीं येतो. (सी) राजकोट, जामनगर आणि सुरत या शहरांच्या म्युनिसिपल हद्दीतील विभाग झोन ३ मध्यें समाविष्ट करण्यांत आला आहे. (डी) पुणें आणि नागपूर म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या हद्दींतील विभाग तसेंच बडोदा आणि भावनगर शहराच्या म्युनिसिपल हद्दींतील विभाग झोन ४ मध्यें मोडतो; (ई) अहमदनगर आणि कोल्हापूर शहरांच्या म्युनिसिपल हद्दींतील विभाग झोन ५ मध्यें येतो, आणि (एफ) सोलापूर शहर म्युनिसिपल हद्दींतील विभाग आणि (ए) ते (एफ) पर्यंत उल्लेख न करण्यांत आलेल्या आणि १९४८ च्या किमान वेतन कायद्याच्या २६ कलमान्वयें योग्य नोटिफिकेशनद्वारें सूट न देण्यांत आलेला अशा प्रकारचा मुंबई राज्याचा राहिलेला विभाग. उमेदवारास, तो ज्या श्रेणींत काम करीत असेल त्या श्रेणीसाठीं निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या ५० टक्के वेतन देण्यांत येईल. मासिक वेतनावर कामावर घेतले असल्यास कामगाराला तो ज्या श्रेणींत काम करतो त्या श्रेणीसाठीं निश्चित केलेल्या मासिक वेतनाच्या किमान दरास २६ नें भागून त्याप्रमाणें किमान दर देण्यांत येतील. हा भाग जवळच्या पूर्ण नया पैशापर्यंत राहील.

हें नोटिफिकेशन १ जून, १९५९ पासून अंमलांत येईल.

त्याच गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालेल्या आणखी एका सरकारी नोटिफिकेशनानुसार १ लक्षांपेक्षा कमी लोकसंख्या (१९५१ च्या शिरगणतीप्रमाणें) असलेल्या भागांत दुकानें किंवा व्यापारी संस्थांमध्यें काम करणाऱ्यांना १ जून, १९५९ पासून दोन वर्षांकरितां १९४८चा किमान वेतन कायदा लागू होणार नाहीं. त्यामुळें अशा विभागांतील कामगारांना आतां निश्चित केलेले किमान वेतनाचे दर ३१ मे, १९६१ पर्यंत लागू होणार नाहींत.

## हिंदी बँकांच्या वसूल मांडवलाचें व रिझर्व्हजूचें एकूण ठेवींशीं प्रमाण १९३९–१९५८

| वर्षअखेर | शेडयूल्ड बँका % | बिगर–शेडयूल्ड बँका % | सर्व बँका % |
|---|---|---|---|
| १९३९ | १३ | २५ | १४ |
| १९४५ | ६ | ११ | ७ |
| १९४९ | ९ | २० | ९ |
| १९५० | ९ | २१ | ९ |
| १९५१ | ९ | २२ | १० |
| १९५२ | ९ | २२ | ११ |
| १९५३ | ९ | २१ | १० |
| १९५४ | ८ | १९ | ९ |
| १९५५ | ७ | १८ | ८ |
| १९५६ | ७ | १६ | ७ |
| १९५७ | ६ | १८ | ६ |
| १९५८ | ५ | १८ | ५ |

## हिंदी बँकांच्या परदेशांतील कचेऱ्या

| देश | १९५६ | १९५७ | १९५८ |
|---|---|---|---|
| एडन ... | १ | १ | १ |
| ब्रि. पूर्व आफ्रिका | ९ | ९ | ९ |
| बर्मा ... | ९ | ९ | ९ |
| सिलोन ... | ३ | ३ | ३ |
| हाँगकाँग ... | २ | २ | २ |
| जपान ... | २ | २ | २ |
| मलाया ... | १३ | १४ | ११ |
| पाकिस्तान ... | ६२ | ५८ | ५६ |
| सिंगापूर ... | | | ४ |
| थायलँड ... | १ | १ | १ |
| ग्रेटब्रिटन ... | ४ | ५ | ५ |
| एकूण... | १०६ | १०४ | १०३ |

## रेल्वे वहातुकीचे भारतांतील दर सर्वांत कमी

| रेल्वे | सरासरी दर ( पया ) | |
|---|---|---|
| | प्रत्येक उतारू मैलास | प्रत्येक टन मैलास |
| हिंदी | ५·३३ | ११·३ |
| ब्रिटिश | १५·५ | ३३·९ |
| कनेडिअन नॅशनल | २९·१ | १३·९ |
| कनेडिअन पॅसिफिक | २७·५ | १३·२ |
| फ्रेंच नॅशनल | २१·४ | २७·० |
| जर्मन फेडरल | १३·४ | २६·१ |
| इटालिअन स्टेट | ११·१ | १८·० |
| जपानीज नॅशनल | ५·४ | ११·२ |
| स्वीडिश स्टेट | १८·८ | २४·७ |
| स्विस फेडरल | १७·२ | ४८·१ |
| अमेरिकन | २४·५ | १२·७ |


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४



कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : – श्री. वा. काळे, संपादक, ' अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.





किर्लोस्कर
अिलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाव्.
आपल्या पिकांची उपासना करण्यासाठी एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरित्या काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठी लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)



सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.
शाखा : फोर्ट, दादर, माहिम, पार्ली, पुणें, बेळगांव
मध्यवर्ती शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई ४.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाटी व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें मांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल मांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. प. राठी.

श्री. गो. वा. देवी श्री. वा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वायू. एस्. जोशी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा
(४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक )
(६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें मांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल मांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |
| एकूण खेळतें मांडवल | रु. ७७,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ३४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ११–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येतें.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत याची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.